# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# सोमवार दिनांक १० मार्च २०२५

## ठळक बातम्या

- **राज्यासाठी नवे औद्योगिक, कामगार, गृहनिर्माण, आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्याची अर्थमंत्री अजित पवार यांची अर्थसंकल्पात घोषणा.**
- **नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे खाजगी सहभागातून श्रेणीवर्धन तर गडचिरोली जिल्ह्यातील खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित करण्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे 500 कोटी रुपये.**
- **विधान परिषदेच्या ५ जागांच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी.**
- **उद्यापासून तीन दिवस अकोल्यात काही ठिकाणी उष्णतेची लाट, तर परवापासून दोन दिवस चंद्रपूर देखील राहणार उष्ण.**

अर्थसंकल्प

राज्याचं नवीन औद्योगिक धोरण, कामगार धोरण, गृहनिर्माण धोरण तसंच आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण लवकरच जाहीर करण्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केली. उद्योग, पायाभूत सुविधा, कृषि आणि संलग्न क्षेत्रे, सामाजिक तसंच इतर क्षेत्राच्या विकासासाठी महत्वाच्या तरतुदी करणारा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. यात नवीन औद्योगिक, कामगार, गृहनिर्माण, जलप्रवास, आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरणाची घोषणा त्यांनी यावेळी केली. नव्या औद्योगिक धोरणातून ५ वर्षात ४० लाख कोटींची गुंतवणूक, ५० लाख रोजगारनिर्मितीचं उद्दिष्ट सरकारनं ठेवले आहे. हवाई वाहतूक, रेल्वे, मेट्रो, महामार्ग, जल वाहतूक, बंदर विकास, सिंचन, ऊर्जा, परिवहन आणि दळणवळण यासारख्या पायाभूत सुविधा क्षेत्रात येत्या ५ वर्षात विक्रमी गुंतवणूक करण्याचा सरकारचा विचार असल्याचं पवार यांनी जाहीर केलं. अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५ ते २०४७ राज्य सरकार तयार करणार आहे. याअंतर्गत पर्यटन केंद्र, तीर्थक्षेत्र, धार्मिक स्थळं,

गडकिल्ले, राष्ट्रीय उद्यानं, अभयारण्यं, ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वसाहतीतल्या रस्त्यांची कामं केली जाणार आहेत. एसटी महामंडळाला नवीन बस खरेदीसाठी सरकार अर्थसहाय्य देणार असून ६ हजार डिझेल बसेसचे CNG, LNG मध्ये रूपांतर करण्याचं काम सुरू आहे. आगामी आर्थिक वर्षाचा एकूण ७ लाख २० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प अजित पवार यांनी आज सादर केला. त्यात ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपयांची महसुली जमा आणि ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपयांचा महसुली खर्च अपेक्षित आहे. यात ४५ हजार ८९१ कोटी रुपये तूट अपेक्षित आहे.

अर्थसंकल्प नागपूर/विदर्भ

अर्थसंकल्प वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत तर वित्तराज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यांनी विधानपरिषदेत सादर केला. या अर्थसंकल्पात विदर्भासह नागपूर जिल्ह्यासाठी काही महत्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे खाजगी सहभागातून श्रेणीवर्धन आणि आधुनिकीकरण करण्यात येत आहे. प्रवासी आणि मालवाहतूक क्षमतेत त्यामुळे वृध्दी होईल. विदर्भाच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला यामुळे चालना मिळेल. मुंबई, नागपूर आणि पुणे महानगरांतील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा आणि वातानुकुलित वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण 143 पूर्णांक 57 किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले आहेत. या सेवेचा लाभ सुमारे १० लाख प्रवासी रोज घेत आहेत. नागपूर मेट्रोचा 40 किलोमीटर लांबीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यात 6 हजार 708 कोटी रुपये किंमतीचं 43 पूर्णांक 80 किलोमीटर लांबीचं काम प्रगतीपथावर आहे. हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी नागपूर येथे “अर्बन हाट केंद्रां”ची स्थापना करण्यात येणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.....

***तांत्रिक वस्त्र उद्योगात जागतिक केंद्र म्हणून विकसित करण्या करता महाराष्ट्र टेक्निकल टेक्स्टाईल मिशन ची स्थापना करण्यात येणार आहेत. विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी याचा उपयोग होईल. हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी नागपूर येथे अर्बन हाट केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे.***

समृद्धी महामार्गामुळे  विदर्भातील जिल्हयांमधील शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. त्याविषयी केलेल्या तरतुदी बद्दल पवार यांनी माहिती दिली......

***हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा ९९ टक्के काम पूर्ण झाले असून या महामार्गालगत ॲग्रो लॉजिस्टिक हब विकसित केले जाणार असून त्यात कोल्ड  स्टोरेज, ग्रेडिंग पॅकिंग व निर्यात हाताळणी केंद्राच्या प्रमुख सुविधा पुरवण्यात येतील. याचा लाभ प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना होईल. वर्धा जिल्हयातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्हयातील पात्रादेवी हा ७६० किलोमीटर लांबीच्या ८६ हजार तीनशे  कोटी रुपये किमतीच्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहेत.***

याशिवाय गडचिरोली जिल्हयात पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास होत आहे असे सांगून पवार म्हणाले कि......

***गडचिरोली जिल्हयातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गाचे जाळे विकसित केले जात आहे. त्या करता पहिल्या टप्प्यात सुमारे पाचशे कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.***

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास  तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ८८ हजार ५७४ कोटी रुपये असून प्रकल्पाचे लाभक्षेत्र 3 लाख 71 हजार 277 हेक्टर आहे. या प्रकल्पाचा लाभ नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा या सहा जिल्हयांना होणार आहे. प्रकल्पाची सविस्तर सर्वेक्षण आणि अन्वेषणाची कामे सुरू आहेत. राज्यात एकूण 18 नवीन न्यायालयांची स्थापना करण्यात आली असून दर्यापूर-जिल्हा अमरावती, पौड, इंदापूर आणि जुन्नर- जिल्हा पुणे, पैठण आणि गंगापूर-जिल्हा छत्रपती संभाजीनगर, आर्वी-जिल्हा वर्धा, काटोल- जिल्हा नागपूर, वणी-जिल्हा यवतमाळ, तुळजापूर-जिल्हा धाराशीव तसेच हिंगोली येथील न्यायालयांचा त्यात समावेश आहे.

अर्थसंकल्प प्रतिक्रिया

अर्थसंकल्प सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे....

***विकसित भारतासोबत विकसित महाराष्ट्र ठरवण्याच्या दिशेनं हा आमचा संकल्प मांडलेला आहे. आणि विशेषतः उद्योग, शेती, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सामाजिक विकास या पंचसूत्रीवर हा अर्थसंकल्प या ठिकाणी आपल्याला काम करताना दिसतो आहे.***

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अर्थसंकल्पावर टीका केली आहे. जे गाडीतून फिरणार आहेत त्यांच्यासाठी असंख्य पूल, टनेलच्या घोषणा केल्या आहेत, पण एसटी बसने, रेल्वेने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य, गरीब, मध्यमवर्गीयांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले आहे, असे ते म्हणाले.

***महाराष्ट्राची महसुली तूट वीस हजार कोटींवरून वाढून पंचेचाळीस हजार आठशे ब्यान्नव कोटी रुपये दाखवलेली आहे. चिंतेची बाब ही आहे की आपलं अधिक्याच बजेट करण्याची परंपरा महाराष्ट्रात या सरकारने गेल्या काही काळात तोडलेली आहे आणि त्याचा फटका महाराष्ट्रातल्या सर्वांनाच आणि विशेषता आदिवासी आणि सामाजिक न्याय पददलितांच्या योजनांच्यावर केला जातो.***

सारथी-विधानपरिषद

राज्यातल्या सारथी, बार्टी, महाज्योती आणि टीआरटीआय या संस्थांमार्फत स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी शिकवणी संस्था गैरव्यवहार करत असतील, तर त्याची चौकशी केली जाईल, असं सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. या स्वायत्त संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्यासाठी निविदा मिळवण्यासाठी उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना तसंच प्रवेशासाठी देखील उमेदवारांना आमिष दाखवले जात असल्याचं सांगत भाजपाचे निरंजन डावखरे यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. यावर उच्चस्तरीय प्रशासकीय समिती नेमण्यात आल्याचं शिरसाट यांनी सांगितलं.

अधिसूचना जारी

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज विधान परिषदेच्या ५ जागांच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली. निवडणुकांसाठी १७ मार्च पर्यंत अर्ज दाखल करता येतील, १८ मार्चला अर्जांची छाननी होईल आणि २० मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता वाटल्यास २७ मार्च रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल.

हवामान

विदर्भात उष्णतेची तीव्रता वाढत असून उद्यापासून तीन दिवस अकोल्यात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून परवापासून दोन दिवस चंद्रपूर येथे देखील काही ठिकाणी उष्णतेची लाट येऊ शकते, असा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. अन्य जिल्हयांमध्ये देखील हवामान कोरडे राहणार असून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत आहे. अकोला इथं आज सर्वाधिक कमाल तापमान 39 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ चंद्रपूर इथं 38 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. तर अमरावती, नागपूर, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशिम, बुलढाणा या सर्व जिल्हयांमध्ये तापमान 37 अंश सेल्सिअसच्या घरात आहे.

*****